फक्त सभासदांसाठी

# अमर हिंद मंडळ, दादर

अमरवाडी, गोखले पथ (उत्तर), दादर, मुंबई - ४०० ०२८.
दूरध्वनी : २४२२ ३५ ८९ / २४२१ ९० ११

**(स्थापना : २६ जानेवारी १९४७)**

(सार्वजनिक विश्वस्त नोंद क्रमांक एफ ४३ (मुंबई) संस्था विधी नोंद क्रमांक १७८६/२५-६-१९४९)

# वार्षिक अहवाल

## (१ एप्रिल २००४ ते ३१ मार्च २००५)



५७ व्या वसंत व्याख्यानमालेचे डॉ. शरदच्चंद्र गोखले यांनी
शिवप्रतीमेला पुष्पहार घालून उद्घाटन केले
(११ एप्रिल २००४) सोबत मंडळाचे पदाधिकारी



१५ ऑगस्ट २००४ भारतीय स्वातंत्र्याच्या ५७ व्या वर्धापनादिनी
समारंभाच्या प्रमुख पाहुण्या श्रीमती वागिश्वरी गोखले यांचे
स्वागत करताना मंडळाचे कार्याध्यक्ष श्री. चिंतामणी नागले
त्यांच्या मागे मंडळाचे उपाध्यक्ष मेजर विजय अडसुळे

# अमर हिंद मंडळ, दादर

## मुंबई - ४०० ०२८.

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

अमर हिंद मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि.२३/१०/२००५ रोजी ~~सकाळी~~ सायंकाळी ~~१०~~ ५.०० वा. मंडळाच्या सभागृहात संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. वसंत भालेकर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेली आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे, ही विनंती.

सभेपुढील कामे :-

१. मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

२. सन् २००४ व २००५ सालचा वार्षिक अहवाल मंजूर करणे.

३. सन् २००४ व २००५ सालचा हिशेब व ताळेबंद मंजूर करणे.

४. सन् २००५-२००६ साठी हिशेब तपासनीस नेमणे व त्यांचे मानधन ठरविणे.

५. सन् २००५-२००६ चे अंदाजपत्रक मंजूर करणे.

६. [illegible] निधीत रक्कम वर्ग करण्याबाबतचा ठराव मंजूर करणे.

७. सन २००५-२००६ ताळेबंदात खालील प्रमाणे कार्यवाही करण्यासाठी कार्यकारी समितीला अनुमती देणे.

अ) 'वैद्यकिय उपकरणे' ताळेबंधात्मक बंदातून संपूर्णपणे बाद करण्यात येऊन सदर रक्कम ' इतर जमेते' करणे.

ब) 'ॲडव्हान्सेस' या सदराखाली दाखविण्यात आलेली रु. १०६१/- ताळेबंदातून संपूर्णपणे बाद करणे आणि 'निधी व देणे' यांत वर्ग करणे.

क) बी. एल. कनस्ट्रक्शन यांना देणी असलेली रक्कम रु. ९,९७८/- ताळेबंदातून बाद करुन सदर रक्कम जमेत वर्ग करणे.

८. मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेपुढे येणाऱ्या अन्य विषयांवर विचार करणे.

दि.३०/९/२००५

कार्यकारी समितीच्या अनुमतीने
उमेश व्यं. शेणॉय
कार्यवाह

सूचना :

१. ज्या सभासदांना काही प्रश्न विचारायचे असतील. त्यांनी ते लेखी स्वरूपात शनिवार दिनांक १५/१०/२००५ पर्यंत मंडळाच्या कार्यालयात सायंकाळी ६ ते ८ या दरम्यानं (रविवार सोडून) आणून द्यावेत.

२. ज्या सभासदांचे पत्ते बदललेले असतील त्यांनी त्यांचे बदललेले पत्ते त्वरित कळवावेत. जे सभासद हयात नसतील अशा सभासदांच्या वारसांनी/संबंधितांनी मंडळास तद्संबंधीची माहिती त्वरित कळवावी.

# वार्षिक अहवाल

## (दिनांक १ एप्रिल २००४ ते ३१ मार्च २००५)

सन्माननीय सभासद बंधुभगिनींनो,

सादर वन्दे

मंडळाचा वार्षिक अहवाल तसेच जमाखर्च आणि ताळेबंद पत्रके आपणाला सादर करताना कार्यकारी समितीस आनंद होत आहे.

या कालावधीत देखील मंडळाची आर्थिक बाजू मजबूत असून क्रीडा, कला, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्यात मंडळ सतत अग्रेसर राहून कार्य करीत आहे हे सर्वश्रुत आहेच. या सर्व कार्यात आपला पाठींबा व प्रोत्साहन सतत आमच्या सोबत आहे. म्हणूनच हे सर्व करणे आम्हास शक्य होत आहे याची नोंद आम्ही कृतज्ञतापूर्वक घेतलेली आहे.

मंडळाचा वार्षिक अहवाल पुढील प्रमाणे आहे.

**<u>सभा</u> :** वरील कालावधीमध्ये कार्यकारी समितीच्या १० सभा झाल्या. कार्यकारी समिती व विश्वस्त यांच्या २ संयुक्त सभा झाल्या. (कार्यकारी समिती सभा उपस्थितीसाठी परिशिष्ट 'अ' पाहा).

मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दिनांक १८ जुलै २००४ रोजी पार पडली या सभेस एकूण ४६ तहहयात सभासद उपस्थित होते.

रविवार दि. ६ जून २००४ रोजी अध्यक्ष, दोन उपाध्यक्ष, तीन विश्वस्त तसेच अकरा कार्यकारी समितीच्या सदस्यांसाठी झालेल्या निवडणूकीचा निकाल सर्वसाधारण सभेत जाहीर करण्यात आला (निवडणूक निकालासाठी परिशिष्ट 'आ' पाहा)

नवीन कार्यकारी समिती दि. १८ जुलै २००४ पासून कार्यरत झाली. समितीने क्रीडा प्रमुख पदी श्री. रमेश वरळीकर आणि कलाविभाग प्रमुख पदी श्री. दत्ता सावंत यांची नेमणूक केली.

**<u>विभागवारी निधी</u>** : अहवाल काळांत इमारत निधी, वसंत व्याख्यानमाला निधी, कलाविभाग निधी व क्रीडा विभाग निधी यात अनुक्रमे रू. १२,००,००० /- (रूपये बारा लाख फक्त) रू. ३०,०००/- (रूपये तीस हजार फक्त), रू. ४०,०००/- (रूपये चाळीस हजार फक्त), रू. ४०,०००/- (रूपये चाळीस हजार फक्त) वर्ग करण्यात आले.

**<u>केटरिंग व्यवस्था</u>** : १ जानेवारी २००५ ते ३० जून २००५ या कालावधीसाठी निविदा मागविण्यात येवून 'अमित केटरर्स' यांना संपूर्ण केटरिंग व्यवस्थेसाठी मुक्रर करण्यात आले. त्यानंतर १ जुलै २००५ ते ३१ डिसेंबर २००५ या कालावधीसाठी त्यांना मुदत वाढ देण्यात आली. या पुढील कालावधीसाठी निविदा मागवून केटरर्स निश्चित करण्याची प्रक्रिया चालू आहे.

**वसंत व्याख्यानमाला** : मंडळाची ५७ वी वसंत व्याख्यानमाला रविवार, दिनांक ११ एप्रिल ते १८ एप्रिल २००४ या दरम्यान मोठ्या दिमाखांत पार पाडली. या व्याख्यानमालेचे उद्‌घाटन आंतरराष्ट्रीय स्तरावरील ख्यातनाम समाज शास्त्रज्ञ व समाज कार्यकर्ते सन्माननीय डॉ. शरच्चंद्र गोखले यांच्या '**भारत दहशतवादाच्या विळख्यात**' या ज्वलंत विषयाने झाले तर समारोप रविवार, दिनांक १८ एप्रिल २००४ रोजी '**पाण्यात दिवे सोडावे**' या आगळ्यावेगळ्या मराठी गझलांच्या सादरीकरणाने करण्यांत आला. (अधिक माहितीसाठी परिशिष्ट 'इ' पहा).

## इतर कार्यक्रम

★ वैद्यराज व्हिजन आणि अमर हिंद मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि. १ ऑगस्ट ०४ रोजी निःशुल्क आयुर्वेदीय रुग्ण निदान चिकित्सा शिबीर आयोजित करण्यांत आले. या शिबीरात सुप्रसिद्ध वैद्य सर्वश्री शिवाजी भोसले (एम. डी.), रामन घुंघराळेकर (एम. डी.) सुभाष मार्लेवार (एम. डी.), नंदकुमार मुळ्ये (बी. ए. एम. एस.) आणि डॉ. स्नेहल बिर्जे (बी. ए. एम. एस्.) हे सहभागी झाले होते. अनेक रुग्ण या शिबीरांत दाखल झाले होते.

★ दिनांक ७ ऑगस्ट २००४ रोजी मंडळाचे दिवंगत अध्यक्ष कै. मधुकर जनार्दन फडके यांच्या प्रथम स्मृती दिनानिमित्त मंडळाने शिक्षण क्षेत्रांतील '**फलश्रुती**' या नामवंत संस्थेच्या एक संचालिका श्रीमती शैलजा मुळ्ये, यांचा फडके सर पद्धतीवर आधारित '**अभ्यास कसा करावा**' हा एस. एस. सी. च्या विद्यार्थ्यांसाठी तसेच त्यांच्या पालकांसाठी एक उद्‌बोधक कार्यक्रम सादर केला.

★ भारतीय स्वातंत्र्याचा ५७ वा वर्धापन सोहळा रविवार, दिनांक १५ ऑगस्ट २००४ रोजी शिक्षण तसेच सामाजिक क्षेत्रांतील एक मान्यवर व्यक्तिमत्व 'श्रीमती वागीश्वरी गोखले' यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करुन साजरा करण्यात आला. या प्रसंगी भारतीय क्रीडा प्राधिकरणाचे (पश्चिम विभाग) उपसंचालक **मा. श्री. विरेंद्र भांडारकर** हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते.

★ मंगळवार, दिनांक २४ ऑगस्ट २००४ रोजी खास महिलांसाठी सौ. भाग्यश्री केतकर आणि त्यांच्या मैत्रिणींचा सहभाग असलेल्या समूहाने फुगड्या, झिम्मा, नाच, गाणी आणि मंगळागौरीतील पारंपारिक खेळांचा '**मंगळागौरीचे खेळ**' हा कार्यक्रम मंडळाने सादर केला. महिलांचा चांगलाच प्रतिसाद या कार्यक्रमाला लाभला..

★ ७ डिसेंबर २००४ रोजी जागतिक एड्‌स दिन सप्ताहानिमित्ताने महिला मेळाव्याचे आयोजन '**आस**' या सामाजिक उपक्रम मंडळाच्या व अमर हिंद मंडळाच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले.

★ २६ जानेवारी २००५ रोजी भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त मंडळाचे संस्थापक आणि

जेष्ठ-श्रेष्ठ सामाजिक कार्यकर्ते, दादर भूषण मा. श्री. प्रकाशभाई मोहाडीकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

संध्याकाळी मंडळाच्या ५८ व्या वर्धापनादिनानिमित्त मंडळाचे आजीव सदस्य माजी कार्यकर्ते, खेळाडू व हितचिंतक या सर्वांचे एक स्नेहसंमेलन आयोजित करण्यांत आले होते. या प्रसंगी 'सागर आर्टस् क्रिएशन' प्रस्तुत व अजंठा आर्टस् प्रकाशित कौटुंबिक जिव्हाळ्याचे नाटक **'सोहळा - गोष्ट प्रेमाची'** याचा प्रयोग सादर केला.

★ ८ मार्च २००५ रोजी आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त विविध महिला संघटना व मंडळाच्या संयुक्त विद्यमाने महिलांचा एक विशाल मेळावा आयोजित करण्यात आला.

## इतर संकीर्ण

★ 'इंडियन असोशिएशन ऑफ रिटायर्ड पर्सन', 'सनातन संस्था', 'सार्वजनिक नवरात्रौत्सव मंडळ' अॅशलेन दादर, 'साईकृपा प्रिन्टर्स', 'निर्मिती बहिःशाल मुक्त विद्यापीठ', 'पाठारे क्षत्रिय होलिकोत्सव फंड', 'दादर जैन पौषधशाळा ट्रस्ट', 'बृहन्मुंबई गणित अध्यापक मंडळ' या संस्थाना विनाशुल्क/सवलतीच्या दरात त्यांच्या कार्यक्रमासाठी मंडळाची जागा उपलब्ध करुन देण्यात आली.

★ हिंदी महासागरात प्रलयंकारी त्सुनामी लाटांनी उध्वस्त झालेल्यांच्या पुनःर्वसनासाठी स्थापन करण्यात आलेल्या 'टाईम्स फाऊंडेशन' कडे मंडळाने एकूण रु. २१,९४९/- चा निधी सुपुर्द केला. यापैकी रु. ११,०००/- मंडळाने देणगी रुपाने दिले.

★ इंडियन असो. ऑफ ब्लाईंड यांना व नववर्ष स्वागत समिती, दादर यांना प्रत्येक रु.१०००/- तर 'श्वास-ऑस्कर फंड' यांना रु. ५०००/- मंडळाच्या वतीने देण्यात आले.

★ आजीव सदस्य आणि माजी खेळाडू, हितचिंतक यांना प्रतिवर्षाप्रमाणे दिवाळी भेटकार्डे मंडळातर्फे पाठविण्यांत आली.

★ चालू वर्षात २०० नवीन खुर्च्या घेण्यांत आल्या. तसेच पाण्याच्या टाकीचीही दुरुस्ती केली.

## विशेष अभिनंदनीय

★ मंडळाचे अध्यक्ष श्री. वसंत भालेकर यांच्या **'सुलोचना'** या पुस्तकाचे प्रकाशन मा. खासदार श्री. धर्मेंद्र यांच्या हस्ते दिनानाथ नाटयगृहात मोठ्या थाटामाटात झाले. या प्रसंगी विविध क्षेत्रातील अनेक नामवंत उपस्थित होते.

★ मंडळाचे कार्योपाध्यक्ष श्री. अरुण देशपांडे यांची सी. के. पी. हॉल अंतर्गत शैक्षणिक समितीच्या कार्याध्यक्षपदी अहवाल काळात निवड झाली.

★ मंडळाचे कार्यवाह श्री. उमेश शेणॉय यांनी ८ ऑगस्ट ते २२ ऑगस्ट २००४ या दरम्यान अथेन्स येथे झालेल्या ऑलम्पिक स्पर्धेअंतर्गत **'ऑलिफिलेक्स २००४'** या टपाल तिकीट स्पर्धेत आपली दोन पुस्तके - 'विंटर ऑलिम्पिक्स' व 'टोटल फुटबॉल' तसेच आपला टपाल तिकीट संग्रह ऑलिम्पिक्स - 'ओरीजीन टू सिडनी' यासह भाग घेवून आपली ऑलिम्पिक्स मधील हॅटट्रीक पूर्ण केली. या स्पर्धेत 'दोन कास्य व एक रौप्य पदक' मिळवून त्यांनी या स्पर्धेत नवीन विक्रम प्रस्थापित केला. त्यांची दोन्ही पुस्तकांचे प्रकाशन न्यायमूर्ती मा. श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या शुभहस्ते दि. ५ ऑगस्ट २००४ रोजी झाले होते. त्यांच्या या घवघवीत यशाबद्दल केद्रींय क्रीडा मंत्री मा. कै. सुनील दत्त यांनी त्यांचे खास अभिनंदन केले.




मंडळाचे कार्यवाह श्री. उमेश शेणॉय यांना शुभेच्छा देताना (डावीकडून) मंडळाचे अध्यक्ष श्री. वसंत भालेकर, श्री. उमेश शेणॉय, न्यायमूर्ती धर्माधिकारी श्री. अशोक प्रधान मराठी व्यापारी मंडळाचे पदाधिकारी श्री. किशोर रांगणेकर, श्री. अनंत भालेकर, श्री. विजय कामेरकर

★ आजीव सदस्य सर्वश्री उदय देशपांडे आणि अनंत भाताडे यांना अनुक्रमे मल्लखांब आणि खोखो कार्यकर्त्यांसाठी असलेले मुंबई शहर जिल्हा क्रीडा पुरस्कार देण्यात आले.

# क्रीडा विभाग

## खो खो

**सांघिक** : यंदाच्या आर्थिक वर्षातील मुंबई (शहर) जिल्हा अजिंक्यपद स्पर्धेतील कुमार गटात मंडळाच्या संघाने प्रत्येक संघाचा दणदणीत पराभव करुन निर्विवादपणे अजिंक्यपद पटकावले, या स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट अष्टपैलू खेळाडूचा बहुमान मंडळाच्या 'रोहन चव्हाणने' पटकावला. **एप्रिल २००३ ते मे २००४ या कालावधीतील सलग पाच कुमार स्पर्धांची अजिंक्यपदे संपादन करुन मंडळाच्या खेळाडूंनी एक विक्रम प्रस्थापित केला आहे.**

ओम समर्थ व्यायाम मंदिर, दादर आणि मुंबई शारीरिक शिक्षण मंडळ यांच्या ज्युनियर खोखो स्पर्धेत मंडळाच्या कुमार संघाला अनुक्रमे २ रा व ३ रा क्रमांक मिळाला.

**वैयक्तिक** : चिंचणी येथे झालेल्या ज्युनियर राज्य अजिंक्यपद स्पर्धेत खेळलेल्या मुंबई (शहर) संघात मंडळाच्या पुढील खेळाडूंचा समावेश होता.

१) रोहन चव्हाण (कर्णधार)
२) प्रसाद कांबळी (उपकर्णधार)
३) निकेश धुरी
४) रीचा फर्नांडिस
५) गीतांजली तुळसणकर

सोलन (हिमाचल प्रदेश) येथे झालेल्या ज्युनियर राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत सहभागी झालेल्या महाराष्ट्र संघात प्रसाद कांबळीची निवड झाली. **लागोपाठ दोन ज्युनियर राष्ट्रीय स्पर्धा खेळलेला अमर हिंद मंडळाचा हा पहिला खेळाडू आहे.** या स्पर्धेपूर्वी चिंचणी राज्य स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट सरंक्षक खेळाडू म्हणून त्याचा गुणगौरव झाला होता. मंडळाच्या पुढील खेळाडूंची राज्य स्पर्धेसाठी मुंबई (शहर) संघात राखीव खेळाडू म्हणून निवड झाली.

| | | |
|---|---|---|
| पुरुष | : | निलेश सावंत |
| महिला | : | शुभदा धुरी, विशाखा गव्हाणे |
| कुमार | : | अमित संत |
| मुली | : | शुभदा कदम |
| किशोरी | : | सोनाली मोंडे, प्रतिक्षा वाडगे |

**टीप** : सोनाली हिचा प्रथम १२ जणींच्या मूळ संघात समावेश होता, हा समावेश निवडसमितीच्या एकमताच्या निर्णयाचा होता, परंतु मुंबई खो खो संघटनेच्या कार्यकारीणीने सोनालीला राखीव खेळाडू बनवले. या अन्यायकारक प्रकरणात मंडळाने खोखो संघटनेकडे सविस्तरपणे तीव्र शब्दात निषेध नोंदविला. या बाबत खो खो संघटनेने मंडळाच्या पत्राला उत्तर दिले नाही.

मंगळवेढा (पंढरपूर) येथील राज्य अजिंक्यपद खो खो स्पर्धेसाठी मुंबई शहर जिल्हा महिला संघात कु. प्रीती धुरीची निवड झाली.

रत्नागिरी येथे झालेल्या सब ज्युनियर राज्य अजिंक्यपद खो खो स्पर्धेसाठी 'कु. उत्कर्ष निंबरे' याची निवड झाली.

आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी 'कु. प्रीती धुरी' व 'शुभदा धुरी' यांचा मुंबई विद्यापीठ संघात समावेश होता.

'कु. शुभदा धुरी' हिला पतियाळा राष्ट्रीय क्रीडा प्रतिष्ठानची क्रीडा शिष्यवृत्ती मिळाली. त्याचप्रमाणे कीर्ती व महर्षी दयानंद कॉलेजच्या आंतर कॉलेज खो खो स्पर्धेतील उत्कृष्ट खेळाडू म्हणून तिचा गुणगौरव झाला.

मंडळाचे खोखो प्रशिक्षक 'श्री. संजय पेडणेकर' यांची मुंबई शहर जिल्हा संघटनेच्या सब ज्युनियर गटाच्या निवड समितीवर नियुक्ती झाली.

## कबड्डी

### सांघिक :

**१) मंडळाच्या महिला संघाने पुढील स्पर्धांची अजिंक्यपदे निर्विवादपणे संपादन केली.**

अ) महाराष्ट्र शासनाची महिला क्रीडा स्पर्धा-मुंबई विभाग बीड येथे झालेल्या राज्य अजिंक्यपद स्पर्धेत मंडळाचा संपूर्ण संघ मुंबई विभागांचे प्रतिनिधित्व करत होता.

ब) माहिम तालुका राष्ट्रवादी कॉंग्रेस संयोजित स्पर्धा

क) रामसेवक क्रीडा मंडळ (चिंचपोकळी) यशोदा रामचंद्र हरचांदे स्मृती चषक जिल्हा स्तरीय स्पर्धा.

**२) महिला संघाचे इतर विशेष**

अ) नागपाडा येथील अजिक्यताराच्या जिल्हा स्तरीय स्पर्धेत उपविजयीपद

ब) महाराष्ट्र कामगार कल्याण केंद्राची बृहन्मुंबई स्तरीय स्पर्धेत मंडळाच्या महिला संघाला ३ रा क्रमांक

क) संकल्प प्रतिष्ठान (वरळी) व ओम क्रीडा मंडळ (भायखळा) यांच्या जिल्हा स्तरीय स्पर्धेत उपांत्य उपविजयी.

**3) पुरुष :** जिल्हा स्तरीय विविध गटांच्या स्पर्धांतून मंडळाच्या संघानी भाग घेतला. त्यांनी मोठे विजयी जरी संपादन करता आले नाही तरी सहभागी संघाच्या संख्येच्या एकंदरीत तुलनेत मंडळाच्या संघांनी बरीच मजल मारली. 'विशेषता कुणाल यादव', 'साईनाथ काळसेकर', 'राहूल वंडेकर', 'तुकाराम तोडकर', 'कमलेश नांदोस्कर', 'प्रीतेश घुडेकर', 'योगेश पवार' इत्यादी खेळाडूंची वैयक्तिक कामगिरी कौतुकास्पद वठली.

### वैयक्तिक :

१) 'अलका पारकर', 'तृप्ती भाटकर' यांची राष्ट्रीय महिला क्रीडा स्पर्धेसाठी महाराष्ट्र (कबड्डी) संघात, तर 'आरती नार्वेकर' हिची राखीव खेळाडू म्हणून निवड

झाली.

२) बंगलोर ज्युनियर राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात 'माधुरी पावसकरची' निवड. **माधुरी ही मंडळाची पहिली ज्युनियर राष्ट्रीय खेळाडू ठरली आहे.**

३) शिवशाही (शिव छत्रपती चषक) अखिल भारतीय तसेच राज्य (सिनियर) अजिंक्यपद स्पर्धेसाठी मुंबई शहर संघात 'अलका पारकर' हिची निवड झाली. 'तृप्ती भाटकरची' मुंबई शहर संघात निवड होऊनही काही अपरिहार्य कारणास्तव 'शिवशाही' चषक स्पर्धेत ती सहभागी होऊ शकली नाही.

४) कराड येथील राज्य अजिंक्यपद (ज्युनियर) स्पर्धेत तसेच परभणी राज्य स्तरीय (ज्युनियर) आंतर जिल्हा स्पर्धेसाठी 'माधुरी पावसकरची' मुंबई शहर संघात निवड झाली. याच स्पर्धेसाठी तिला सर्वोत्कृष्ट अष्टपैलू बहुमान मिळाला.

५) नांदेडच्या अश्वमेघ आंतर विद्यापीठ कबड्डी स्पर्धेकरीता 'तृप्ती भाटकर' हिची मुंबई विद्यापीठ संघात निवड झाली.

६) 'कुणाल यादव', 'साईनाथ काळसेकर', 'राहुल वंडेकर', अलका पारकर, तृप्ती भाटकर, मिनाक्षी गोटम, तेजस्वीनी मयेकर, 'माधुरी पावसकर', 'मधुरा मोरे', 'प्रियांका झेंडे', 'कमलेश नांदोस्कर' यांचा विविध स्पर्धांतून वैयक्तिक पराक्रमाबद्दल विशेष गुणगौरव झाला.

७) 'कु. मधुरा मोरे' हिला माहिम तालुक्यातील सर्वोत्कृष्ट उदयोन्मुख खेळाडू म्हणून रु. ५०००/- ची क्रीडा शिष्यवृत्ती मिळाली.

## इतर विशेष :

१) 'साईनाथ मंडळ, दादर' यांनी आयोजित केलेल्या १० कि. मी. मिनी मॅरॉथॉन स्पर्धेत मंडळाचा खो खो खेळाडू 'निलेश सावंत' याने ३ रा क्रमांक पटकाविला आणि ५ वी ते ७ वी इयत्तेतील विद्यार्थ्यांसाठी ३ कि. मी. स्पर्धेत खो खो पटू 'विनीत कागडाला' २ रा क्रमांक मिळाला.

२) अथेन्स (ऑगस्ट २००४) ऑलिम्पिकच्या निमित्ताने स्पर्धाकाळातील मंडळात आयोजित केलेल्या वर्तमानपत्रकात्रण प्रदर्शनात मंडळाच्या खेळाडूंचा स्पर्धात्मक सहभाग लाभला. १) विशाखा गव्हाणे, २) निलेश सावंत व ३) प्रीती धुरी हे खेळाडू पारितोषिकांचे मानकरी ठरले.

३) खो खो प्रशिक्षक 'श्री. जतीन टाकळे' यांना भारतीय खोखो फेडरेशनची राष्ट्रीय खो खो पंच म्हणून मान्यता मिळाली.

## दैनंदिन सराव :

| | | |
|---|---|---|
| १) | कबड्डी | : मुले - मुली : श्री. विजय राणे |
| २) | खो खो | : मुली : श्री. प्रफुल्ल पाटील / श्री. संजय पेडणेकर |
| | | मुले : श्री. रमेश नाटेकर / श्री. जतीन टाकळे |

क्रीडा प्रमुख 'श्री. रमेश वरळीकर' आवश्यक असेल तेव्हा खोखोत मार्गदर्शन करतात. संबंधित प्रशिक्षक जेव्हा अनुपस्थित असतात तेव्हा संघातील जेष्ठ खेळाडू सरावाची जबाबदारी पार पाडतात.

मंडळाच्या क्रीडाविभागाच्या विविध समस्यांवर विचार विनिमय करण्यासाठी क्रीडा विभाग प्रमुखांबरोबर कार्यकारी सदस्य सर्वश्री 'डॉ. स्नेहल बिर्जे' आणि 'चारुदत्त थरवल' यांची सल्लागार म्हणून कार्यकारी समितीने दि. ८ ऑक्टोबर २००४ पासून नियुक्ती केली.

## व्याख्यानाचे आयोजन :-

"क्रीडा स्पर्धातून नित्यनियमाने निर्माण होणाऱ्या आव्हानांना सामोरे जायचे असेल तर क्रीडापटूंनी उत्तम फिटनेस जोपासणे ही आजच्या धावत्या काळाची गरज आहे." - रविवार दि. २० मार्च २००५ रोजी आयोजित केलेल्या **"क्रीडापटूंचा फिटनेस"** या विषयावर मार्गदर्शन करतांना 'डॉ. दिलीप नाडकर्णी' बोलत होते.

डॉ. नाडकर्णी हे सुप्रसिद्ध ऑर्थोपिडीक शल्यविशारद असून मुंबईच्या लिलावती हॉस्पिटलमध्ये कार्यरत आहेत. ते स्वतः टेबल टेनिसचे उत्तम खेळाडू असून राष्ट्रीय कीर्तीचे खेळाडू व सिनेकलावंत यांच्या घुडगे दुखीवर त्यांनी यशस्वी उपचार केलेले आहेत. फिटनेस विषयावर त्यांनी दोन पुस्तकेही लिहीलेली आहेत.

दीड तास चाललेल्या त्यांच्या या व्याख्यानाला सुमारे ७५ व्यक्तिंची उपस्थिती होती, यात कबड्डी, खोखो, क्रिकेट, जिमनॅस्टिक, मल्लखांब, अॅथलेटिक्स अशा विविध खेळांशी संबधित असलेले खेळाडू व कार्यकर्ते होते.

फिटनेसचे महत्व समजावून सांगताना 'डॉ. नाडकर्णी' यानी खेळाडूंची शारीरिक क्षमता, आहार, स्टॅमिना, मनाची एकाग्रता, वॉर्मिंग अप, कुलींग डॉऊन अशा खेळ व खेळाडूंशी निगडीत असणाऱ्या मुद्यांना स्पर्श केला, 'एकाच उंचीचे व एकाच वयाचे दोन खेळाडू असतील तर ज्याची फॅट कमी व वजन जास्त असेल तो खेळाडू अधिक फीट आहे,' हा मुद्दा त्यांनी उदाहरणासकट देऊन स्पष्ट केला.

उपस्थितीतांकडून आलेल्या अनेक प्रश्नांना समाधानकारक उत्तर देऊन, एक किचकट पण तितकाच महत्वाचा मनोरंजक कार्यक्रम करुन डॉ. नाडकर्णींनी सर्वांची मने जिंकली.

एक चांगला उपक्रम आयोजित केल्याबद्दल सर्वांनी मंडळाला धन्यवाद दिले व अशाच तऱ्हेने मार्गदर्शनपर कार्यक्रम वारंवार व्हावेत अशी अपेक्षा व्यक्त केली.

# खो खो स्पर्धा संयोजन

मंडळाचे माजी जेष्ठ पदाधिकारी दिवंगत 'कै. श्रीधर भोसले' व दिवंगत 'कै . एकनाथ साटम ' यांच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी ३ मे ते ७ मे २००४ या कालावधीत मंडळाने विभागीय (तीन जोड जिल्हे) खो खो स्पर्धेचे आयोजन आपल्या पटांगणात केले.

पुरूष व महिला गटाची ही स्पर्धा मुंबई शहर मुंबई उपनगर व ठाणे जिल्हा संघटनांशी सलग्न असलेल्या आमंत्रित संघासाठीच होती. या स्पर्धेसाठी "सिनियर गटात महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केलेल्या खेळाडूंना सहभागी होता येणार नाही." अशी विशिष्ट अट घालून स्पर्धेला जिल्हा व राज्य संघटनांची मान्यता घेण्यात आली होती.

पुरूष गटात १४ व महिला गटात १० संघ सहभाग लाभलेली ही स्पर्धा आपल्या उपलब्ध एकाच क्रीडांगणावर संपूर्ण बाद पद्धतीने खेळविण्यात आली. नवोदित खेळाडूंत आत्मविश्वास निर्माण करणाऱ्या या स्पर्धेचा मूलभूत हेतू उत्तमपणे यशस्वी झाला. किंबहुना खोखोतील जेष्ठ-श्रेष्ठ कार्यकर्त्यांनी खेळाडूंनी या उपक्रमाबद्दल उत्तम अभिप्राय दिला.

स्पर्धेचे उद्‌घाटन मुंबई क्रिकेटचे प्रशिक्षक 'श्री. चंद्रकांत पंडित', तर सांगता सोहळा क्रिकेट समालोचक श्री. सुरेश सरय्या यांच्या अध्यक्षतेखाली झाले. या दोन्ही समारंभाचे प्रमुख अतिथी म्हणून अनुक्रमे सुप्रसिद्ध उद्योजक 'श्री. विलास गावकर' व मल्लखांब - जिमनॅस्टिकचे राष्ट्रीय कीर्तीचे संघटक 'श्री. महेंद्र चेंबूरकर' यांची उपस्थिती लाभली होती.

अंतिम सामन्याप्रसंगी अनपेक्षित पावसाने आणलेला व्यत्यय वगळता स्पर्धा छान रंगली. स्पर्धेतील सनसनाटीचे अनेक प्रसंग दीर्घकाळ स्मरणात राहणारे होते. मंडळाच्या नवोदित कार्यकर्त्यांना स्पर्धा संयोजनाचा चांगला अनुभव मिळाला, या अनुभवांतून आणखी एका मोठ्या स्पर्धेचे संयोजन ते पेलवू शकतील असा विश्वास वाटतो. या स्पर्धेची प्रसिद्धीही समाधानकारक होती. गॅलरीमुळे प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद लाभला.

क्रीडाक्षेत्रातील तसेच अन्य प्रतिष्ठितांना आपण खास भेटीची आमंत्रणे पाठविली होती. त्यांपैकी अनेकांनी स्पर्धेला भेट देऊन समाधान व्यक्त केले. कै. भोसले व साटम यांच्या कौटुंबिक व्यक्तिंनीही उपस्थिती राखली.

या स्पर्धेच्या निमित्ताने खोखो खेळासंबंधी तयार केलेले चित्र फलक व इतर प्रदर्शित केलेली खास उपयुक्त माहिती हे विशेष आकर्षण होते, त्यामुळे या स्तुत्य उपक्रमांच्या प्रयत्नांचे समाधान मिळाले.

पुरूष विजयी संघाला 'श्रीधर भोसले स्मृती चषक' व महिला विजयी संघाला 'साटम स्मृती चषक' बहाल करण्यात आला. शिवाय वैयक्तिक पारितोषिके व रोख रक्कम असाही सिलसिला होता. उपांत्य उपविजयी संघांना विजयी चिन्ह आणि प्रत्येक सामन्यातील उभय संघांच्या सर्वोत्कृष्ठ अष्टपैलू खेळाडूंना आकर्षक भेटवस्तू असा उपक्रम खो खो स्पर्धांतून मंडळानेच अमलात आणला हे विशेष. पारितोषिकांसाठी पुढील व्यक्तींचे आर्थिक सहाय्य लाभले.

अमर हिंद मंडळाचे विश्वस्त 'श्री. दिनकर पाटील' तसेच मंडळाचे आजिव सभासद 'श्री. सतिश भोसले', 'श्री. विलास कारेकर' व ''सुप्रीम पेट्रो'' चे विमा मार्गदर्शक 'श्री. आर. पी. गुप्ता' आणि ''न्यू इंडिया ॲश्यूरन्स'' चे विभागीय अधिकारी 'श्री. कल्याणपूरकर'.

'श्री जहांगिर तांबोळी' (सांगली) आणि 'श्री. साईनाथ देसाई' (मुंबई) हे अनुक्रमे राज्य व जिल्हा संघटनांचे निरीक्षक या नात्याने संपूर्ण काळ उपस्थित होते.

स्मरणिका मात्र काही तांत्रिक अडचणीमुळे स्पर्धेप्रसंगी प्रसिद्ध होऊ शकली नाही पण नंतर ती प्रकाशित करण्यांत आली.

# स्पर्धेचे निर्णय

**'श्रीधर भोसले चषक'** (पुरुष)

| | | |
|---|---|---|
| अजिंक्य संघ | : | ओम समर्थ भारत व्यायाम मंदिर, माहिम |
| उपविजयी संघ | : | विद्यार्थी क्रीडा केंद्र, परळ |
| उपांत्य उपविजयी संघ | : | १) विजय क्लब, दादर |
| | | २) सरस्वती स्पोटर्स् क्लब, माहिम. |

**'एकनाथ साटम चषक'** (महिला)

| | | |
|---|---|---|
| अजिंक्य संघ | : | परांजपे स्पोटर्स् क्लब, अंधेरी |
| उपविजयी संघ | : | विजय क्लब, दादर |
| उपांत्य उपविजयी संघ | : | १) अमर हिंद मंडळ, दादर |
| | | २) सुभाष क्रीडा केंद्र, चेंबूर |

# वैयक्तिक पारितोषिके

| | | |
|---|---|---|
| **सर्वोत्कृष्ट सरंक्षक** | : | १) केदार सुर्वे (ओम समर्थ भारत व्या. मंदिर) |
| | | २) किर्ती चव्हाण (परांजपे स्पोटर्स् क्लब) |
| **सर्वोत्कृष्ट आक्रमक** | : | १) प्रशांत आंब्रे (विद्यार्थी क्रीडा केंद्र) |
| | | २) जयश्री शिगवण (विजय क्लब) |
| **सर्वोत्कृष्ट अष्टपैलू** | : | १) अमित मांडवकर (ओम समर्थ भारत व्या. मंदिर) |
| | | २) अनिता राज (परांजपे स्पोटर्स् क्लब) |

# कला विभाग

## बालनाटय प्रशिक्षण शिबीर

मंडळाच्या कलाविभागाने ११ एप्रिल २००४ ते २१ एप्रिल २००४ या कालावधीत बालनाटय प्रशिक्षण शिबीराचे आयोजन केले. या शिबीरात २७ शिबीरार्थींनी प्रवेश नोंदविला. या शिबीराचे उद्घाटन 'श्री. कमलाकर नाडकर्णी' यांच्या मार्गदर्शनाने झाले. तर 'श्रीमती वंदना विटणकर', 'श्री. संजय क्षेमकल्याणी', 'श्री. रमेश वरळीकर', 'श्री. रत्नाकर पिळणकर', 'श्री. राजू बनसोडे', 'श्री. प्रशांत टिपणीस', 'कु. सीमा घोगळे' यांनी अन्य दिवशी मार्गदर्शन केले, संपूर्ण शिबीराचे संचालन कलाविभाग प्रमुख 'श्री. दत्ता सावंत' यांनी केले. तर 'तेजस कुळकर्णी', 'सीमा घोगळे', 'योगेंद्र माने', 'जितेंद्र आगरकर', 'भाग्यश्री पाणे' यांनी त्यांना सहकार्य केले.

समारोप सोहळ्यात ''आम्हाला शेपूट हवे'' ''सुखी माणसाचा सदरा'' ही बालनाट्ये शिबीरार्थींनी सादर केली आणि रसिकांचे मनोरंजन केले. कलाविभागाचे कलाकार आणि आताची सुप्रसिद्ध अभिनेत्री सुचित्रा बांदेकर यांच्या हस्ते शिबीरार्थींना प्रशस्तीपत्रके तसेच सन्मान चिन्हे देऊन गौरविण्यात आले.

बालनाटय प्रशिक्षण शिबीराच्या माध्यमातून मुलांवर संस्कार करणाऱ्या या शिबिराचे आयोजन केल्याबद्दल अनेक पालकांनी समाधान व्यक्त केले.

## कै. आबा पडते राज्यस्तरीय 'प्रेक्षक न्यायाधीश' एकांकिका स्पर्धा

मंडळाचे संस्थापक सदस्य 'कै. आबा पडते' यांच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात येणाऱ्या ह्या एकांकिका स्पर्धेने आता हौशी रंगभूमिवरील अग्रगण्य स्पर्धामध्ये आपले स्थान प्राप्त केले आहे.

या स्पर्धेची प्राथमिक फेरी १० ऑक्टोबर २००४ रोजी सकाळी ९ पासून पुढे दोन गटांमध्ये घेण्यात आली. एकूण एकतीस स्पर्धक संस्थांनी सहभाग नोंदविला. 'श्री. संजय डहाळे', 'श्री. हेमंत भालेकर', 'श्री. संभाजी सावंत', 'श्रीमती मृणाल चेंबूरकर' यांनी प्राथमिक फेरीचे परिक्षक म्हणून काम पाहिले. स्पर्धेची अंतिम फेरी २३ व२४ ऑक्टोबर २००४ रोजी झाली. प्रेक्षक न्यायाधीशांना मार्गदर्शन करण्यासाठी प्रसिद्ध नाटककार 'श्री. आनंद म्हसवेकर' उपस्थित होते. तर समन्वयक म्हणून 'श्री. संजय क्षेमकल्याणी' यांनी काम पाहिले. 'श्री. संदिप विचारे', 'श्री. सुरेंद्र रोटे', 'श्री. दीपक सलामवाड', 'श्री. विलास गुर्जर' आणि 'श्रीमती मिनल पुजारी' यांनी प्रेक्षक न्यायाधीश म्हणून काम पाहतांना त्यांनी, संवेदना परिवारचे **''मी''** -प्रथम विकास महाविद्यालयचे- **'ही संगीत शीव पंचायतनाची दुसरी बाजू'** द्वितीय, तर स्माईल क्रियेशन्सचे- **'आस्था आणि गवारीची भाजी'** तृतीय, अशी निवड केली.

स्पर्धेच्या पारितोषिक वितरणासाठी सुप्रसिद्ध अभिनेते 'श्री. अरुण नलावडे' उपस्थित होते. त्यांच्या हस्ते अंतिम विजेत्या संस्था, कलाकार, तंत्रज्ञ यांना सन्मानित करण्यात आले.




श्री. अरुण नलावडे यांचे स्वागत करताना मंडळाचे विश्वस्त ॲड. मुकुंद तिवरेकर

'श्री. अरुण नलावडे' यांनी निर्मित, अभिनित केलेला, **'श्वास'** हा चित्रपट ऑस्कर पारितोषिकांसाठी निघाल्याचे औचित्य साधून अमर हिंद मंडळाने रु. पाच हजार देणगी 'ऑस्कर फंडासाठी' दिली.

या स्पर्धेचे आयोजन अमर हिंद मंडळाच्या कार्यकारी समितीच्या मार्गदर्शनाखाली कलाविभाग प्रमुख 'श्री. दत्ता सावंत' यांनी केले तर 'श्री. योगेंद्र माने', 'कु. भाग्यश्री पाणे', 'श्री. चंदन जमदाडे', 'श्री. अनंत घोगळे' यांनी सहकार्य केले.

हौशी रंगभूमीवरील कलाकारांना स्पर्धेसाठी अधिक विस्तीर्ण व्यासपिठ मिळावे यासाठी मंडळाने पुढील वर्षी या स्पर्धेची अंतिम फेरी श्री. शिवाजी मंदिर येथे घेण्याचे ठरविले आहे.

## महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धा

कलाविभागाने प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी महाराष्ट्र राज्य नाटक स्पर्धेत भाग घेतला. यावर्षी 'श्री. भाग्येश खरे' लिखित **'जीणे उणे उणे...'** हे नाट्य सादर केले. या नाटकाचे दिग्दर्शन 'श्री. सुहास सावरकर' यांनी केले. या नाटकात 'विनायक हेगिष्टे', 'योगेंद्र माने', 'समीर दाते', 'तेजश्री वैद्य' यांनी काम केले तर प्रमुख भूमिकेतील 'सौ. वर्षा दांदळे', 'श्री. समीर पेणकर' यांना अभिनयाची पारितोषिके मिळाली.

अमर हिंद मंडळाचा कलाविभाग योग्य दिशेने वाटचाल करीत असून हौशी, होतकरु, तरुण कलाकार, तंत्रज्ञ यांना व्यासपीठ उपलब्ध करुन देतानाच तज्ञ मार्गदर्शकांचे मार्गदर्शन देखिल उपलब्ध करुन देत आहे.

# कार्यकारी समितीच्या सभा उपस्थितीची माहिती
## (परिशिष्ट 'अ')

| | |
|---|---|
| १) श्री. चिंतामणी वि. नागले (कार्याध्यक्ष) | १० |
| २) श्री. अरूण अ. देशपांडे ( कार्योपाध्यक्ष) | १० |
| ३) श्री. उमेश व्यं. शेणॉय (कार्यवाह) | ९ |
| ४) श्री. सतीश श. रेडीज (सहकार्यवाह) | ८ |
| ५) श्री. श्रीकृष्ण शं. राणे (कोषाध्यक्ष) | ७ |
| ६) श्री. दीपक ना. पडते (सदस्य) | ७ |
| ७) श्री. भास्कर भिवा केरकर (सदस्य) | १० |
| ८) श्री. चारूदत्त शां. थरवल (सदस्य) | ८ |
| ९) श्री. दत्ता अ. सावंत (सदस्य) | ७ |
| १०) श्री. संजय वि. पेडणेकर (सदस्य) | १० |
| ११) डॉ. स्नेहल मा. बिर्जे (सदस्य) | ९ |
| १२) श्री. प्रफुल्ल दा. पाटील (सदस्य) | १० |
| १३) श्री. विजय प्र. राणे (सदस्य) | १० |
| १४) सौ. विद्या वि. अडसूळे (सदस्य) | ० |

# त्रैवार्षिक कार्यकारी समितीच्या निवडणूकीचा निकाल

## (परिशिष्ट ‘आ’)

१) श्री. दीपक पडते

२) श्री. चिंतामणी नागले

३) श्री. संजय पेडणेकर

४) श्री. श्रीकृष्ण राणे

५) श्री. सतीश रेडीज

६) श्री. उमेश शेणॉय

७) डॉ. स्नेहल बिर्जे

८) श्री. अरुण देशपांडे

९) श्री. विजय राणे

१०) श्री. चारुदत्त थरवल

११) श्री. भास्कर केरकर

**श्री. संजीव ठाकूरदेसाई हे पराभूत झाले.**

# वसंत व्याख्यानमाला (वर्ष ५७ वे)

## कार्यक्रम पत्रिका

(परिशिष्ट 'इ')

रविवार दि. ११ एप्रिल, २००४

उद्‌घाटक वक्ते : डॉ. शरच्चंद्र गोखले

विषय : **'भारत दहशतवादाच्या विळख्यात'**

सोमवार दि. १२ एप्रिल २००४

वक्त्या : श्रीमती लता राजे

विषय : **'भारताचे परराष्ट्र धोरण'**

मंगळवार दि. १३ एप्रिल २००४

वक्त्या : श्रीमती उल्का महाजन

विषय : **'जन आंदोलनांचा लोकशाहीतील सहभाग'**

बुधवार दि. १४ एप्रिल २००४

वक्ते : श्री. वामन देशपांडे

विषय : **'ज्ञानेश्वरीच्या निमित्ताने'**

गुरूवार दि. १५ एप्रिल २००४

वक्ते : श्री. सदानंद दाते, आय. पी. एस. पोलीस अधिक्षक

विषय : **'आर्थिक गुन्हेगारीचे निरोगी समाजाला लागलेले ग्रहण'**

शुक्रवार दि. १६ एप्रिल २००४

वक्ते : विंग कमांडर (निवृत्त) श्री. रविंद्र वसंत पारसनीस

विषय : **'भारत - पाक सुंदोपसुंदीची छुपी कहाणी'**

शनिवार दि. १७ एप्रिल २००४

वक्ते : कवितेच्या विश्वातील एक महनीय व्यक्तिमत्व, साऱ्या महाराष्ट्राचे भूषण कविवर्य मंगेश पाडगांवकर

विषय : **'कविवर्य मंगेश पाडगांवकर'** यांची मुलाखत. व श्रोत्यांना आवडणाऱ्या काही कवितांचे वाचन.

रविवार दि. १८ एप्रिल २००४

गझलकार : श्री. माधव भागवत
श्रीमती सुमित्रा भागवत
श्री. सदानंद डबीर
श्री. मनोहर रणपिसे
सौ. ललिता बांठिया

विषय : **'पाण्यात दिवे सोडावे'** मराठी गझलांचे अभिनव सादरीकरण संवेदना निर्मित.

# अमर हिंद मंडळ, दादर

## १ एप्रिल २००४ ते १८ जुलै २००४

### ❖ विश्वस्त ❖

श्री. दिनकर शं. पाटील　　श्री. मुकुंद आ. तिवरेकर

श्री. एकनाथ ना. साटम (२१ फेब्रु. २००४ पर्यंत)

| | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष** | : | श्री. मधुकर ज. फडके (७ ऑगस्ट २००३ पर्यंत) |
| **उपाध्यक्ष** | : | श्री. रमेश मा. वरळीकर |
| | | श्रीमती उषा मेहता |
| **कार्याध्यक्ष** | : | श्री. चिंतामणी वि. नागले |
| **कार्योपाध्यक्ष** | : | श्री. अरूण अ. देशपांडे |
| **कार्यवाह** | : | श्री. उमेश व्यं. शेणॉय |
| **सह कार्यवाह** | : | श्री. सतीश श. रेडीज |
| **कोषाध्यक्ष** | : | श्री. श्रीकृष्ण शं. राणे |
| **सदस्य** | : | श्री. दीपक ना. पडते |
| | | श्री. भास्कर भि. केरकर |
| | | श्री. चारूदत्त शां. थरवल |
| | | श्री. दत्ता अ. सावंत |
| | | श्री. संजय वि. पेडणेकर |
| | | डॉ. स्नेहल मा. बिर्जे |
| | | श्री. प्रफुल्ल दा. पाटील (स्वीकृत) |
| | | श्री. विजय प्र. राणे (स्वीकृत) |
| | | ॲड. विद्या वि. अडसुळे (स्वीकृत) |

# अमर हिंद मंडळ, दादर

## १८ जुलै २००४ ते ३१ मार्च २००५

### ★ विश्वस्त ★

श्री. दिनकर पाटील    ॲड. श्री. मुकुंद तिवरेकर

श्रीमती उषा मेहता

| | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष** | : | श्री. वसंत भालेकर |
| **उपाध्यक्ष** | : | श्री. रमेश वरळीकर |
| | | मेजर श्री. विजय अडसुळे |
| **कार्याध्यक्ष** | : | श्री. चिंतामणी नागले |
| **कार्योपाध्यक्ष** | : | श्री. अरुण देशपांडे |
| **कार्यवाह** | : | श्री. उमेश शेणॉय |
| **सहकार्यवाह** | : | श्री. सतीश रेडीज |
| **कोषाध्यक्ष** | : | श्री. श्रीकृष्ण राणे |
| **सदस्य** | : | श्री. भास्कर केरकर |
| | | श्री. चारुदत्त थरवल |
| | | श्री. दिपक पडते |
| | | श्री. संजय पेडणेकर |
| | | श्री. विजय राणे |
| | | डॉ. स्नेहल बिर्जे |
| **सदस्य (स्वीकृत)** | : | श्री. दत्ता सावंत |
| **सदस्य (स्वीकृत)** | : | श्री. प्रफुल्ल पाटील |



वर्षभरात सांघिक पराक्रम करणारा अमर हिंद मंडळाचा कबड्डी संघ



एका स्थानिक कबड्डी स्पर्धेत यशस्वी पकड करताना अमर हिंद मंडळाचा संघ



**सलग पाच ज्युनियर खो-खो स्पर्धांची अजिंक्यपदे मिळविणारा मंडळाचा कुमार संघ**





**२६ जानेवारी २००५ मंडळाच्या ५८ व्या वर्धापनादिनी ज्येष्ठ समाजसेवक दादर भूषण श्री. प्रकाशभाई मोहाडीकर प्रमुख पाहुणे म्हणून आपले मनोगत व्यक्त करताना सोबत मंडळाचे पदाधिकारी.**


मंडळाचे दिवंगत माजी पदाधिकारी

## श्रीधर भोसले व एकनाथ सातम

यांच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी आयोजित केलेल्या विभागीय खो खो स्पर्धेचे कायम स्वरुपाचे चषक.



श्रीधर भोसले स्मृती चषक



एकनाथ सातम स्मृती चषक